Review Of Research
Vol. 2 | Issue. 6 | March. 2013
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वर्धा जिल्हयातील पतपुरवठा आणि शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतांना जाणवलेल्या समस्या: एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. राजीव म. जाधव१ , डॉ. बबनराव बी. तायवाडे२**
१संशोधनकर्ता, वाणिज्य विभाग, लोक महाविद्यालय, वर्धा.
२ मार्गदर्शक, प्राचार्य , धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.

## सारांश

भारतीय बँका एका अर्थाने पतपुरवठयाचा (क्रेडिट) व्यवहार करणाऱ्या संस्था आहेत व दुसऱ्या अर्थाने त्या ऋणको व धनको यामधील दुवा साधणाऱ्या मध्यसंस्था आहेत. व्याख्या करताना मुख्यता बँकाच्या या दोन व्यवहारांचा आधार घेतला जातो, असे आढळते. बँक आपल्याजवळ असलेल्या निधींच्या आधारे पत निर्माण करते व ही पत मुद्रा (क्रेडिट – मनी– चेक, हुंडी, वचनचिठ्ठी, इत्यादी ) सामान्य मुद्रेप्रमाणेच व्यवहार मिटविण्याचे कार्य करीत असते. सार्वजनिक उद्योग आणि व्यवहार सुकर व्हावेत म्हणून स्थापन झालेल्या सरकारी अथवा निमसरकारी बँकेचा लाभ हा एकमेव उद्देश नसतो तर जनतेची सेवा आणि विकास हा त्यांचा प्रधान उद्देश समजला जातो. सहकारी बँक किंवा पतपुरवठा करणारी संस्था ही सभासदांना परस्पर सहाय्यभूत होणारी संस्था असून, बचत आणि पतकर्ज याद्वारे ती मर्यादित साधने असणाऱ्या, एकत्र आलेल्या सभासद व्यक्तिंना अथवा संस्थांना उपयुक्त असते.

## प्रस्तावना

सहकारी बँक ही अन्य कोणत्याही बँकेसारखे व्यवहार करण्यास मुक्त असते. शिवाय या क्षेत्रातील विशिष्ट गरज लक्षात घेता, काही खास प्रकारच्या आर्थिक संस्थाही तेथे निर्माण झाल्या आहेत असे दिसेल. त्याचप्रमाणे त्या स्वतंत्रपणे ज्यावेळी व्यवहार करीत असतात, त्याच वेळी त्या एकसंघ व्यवस्थेच्या घटक म्हणूनही कार्य करीत

असतात. उदाहरणार्थ, प्राथमिक सहकारी पतपेढी ही जिल्हा सहकारी पतपेढीची संलग्न संस्था असते व जिल्हा संस्था ही राज्यासाठी असलेल्या सर्वोच्च सहकारी बँकेची संलग्न संस्था असते. अशी ही वरुन पासून खाली, अंतिम कर्जदार सभासद व्यक्तींच्या पातळीपर्यंत परस्पनिगडीत संस्थांची बनलेली एक यंत्रणा होय, अल्प मुदतीच्या अर्थपुरवठयासाठी अशी ही व्यवस्था आढळून येते. तशी दीर्घ मुदतीच्या अर्थ पुरवठयासाठीही भू तारण बँकांच्या रुपांत ती अस्तित्वात आहे. सहकारी भू-तारण बँकाचे विशिष्ट स्वरुप सोडले तर कोणत्याही सामान्य आर्थिक संस्था सारखेच या बँकांचे वरुप असते. पण त्यांचे संघटन आणि कार्यक्षेत्र यामध्ये फरक दिसून आल्याविना राहत नाही. अर्थात ज्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीत त्याचा उगम झाला व त्या प्रगत झाल्या त्याचा परिणाम त्यांच्या संघटनांवर झाल्याविना राहत नाही. लोकांच्या, लोकांनी, लोकांसाठी चालविल्या जाणाऱ्या त्या संस्था असल्यामुळे त्यांच्या गरजांनुसार त्यांचे संघटन, संचालन होणे अपरिहार्य आहे. ज्या सभासदांची मिळून ही संस्था बनलेली असते त्यांचे हितसंबंध किती प्रमाणात संरक्षिले जातात ही अर्थातच त्या संस्थेच्या यशाची कसोटी मानता येईल. जॉइंट स्टॉक बँक ही भांडवलप्रधान अर्थरचेत भांडवलदारांच्या गरजांना प्राधान्य देणारी संस्था मानली, तर सहकारी बँक अथवा पतपेढी ही मर्यादित उत्पन्न असणाऱ्या गरजू सभासदांची संस्था असते. मग ते शहरातील असोत अथवा ग्रामीण क्षेत्रातील असोत. शेतकरी अथवा लहान उद्योग करणाऱ्या लहान व्यक्ती एकत्र येऊन आपल्या गरजा अशा संस्थांच्या मार्फत मागविण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांची दाद मोठया जॉईंट स्टॉक बँका घेत नाहीत. आपापल्या लहान लहान बचती एकत्र करुन कर्ज उभारण्याची शक्ती ते वाढवितात व सवलतीच्या दराने व शेतींवर आपापली गरज ते भागवितात. ही सरकारी बँकेमागची मुख्य भूमिका असते. ही सरकारी बँक, पतपेढी, भू तारण बँक, घरबांधणीसाठी अर्थपुरवठा करणारी संस्था, कामगारांची अथवा वैतनिकांची (सॅलरी अर्नर्स) संस्था, नागरी (अर्बन) बँक, धान्य बँक (ग्रेन्स बँक) अशी अनेक विविध रुपे घेऊन कार्य करीत असते. आधी म्हटल्याप्रमाणे व्यक्तींनी स्थापन केलेल्या या संस्था दुय्यम पातळीवर संघरुपाने नवीन संस्था निर्माण करतात. म्हणून त्यांचे प्राथमिक आणि दुय्यम संस्था असे वर्गीकरण करता येते. वास्तविक अर्थाने सहकारी पतपेढी ही प्राथमिक असून दुय्यम पातळीवरील सहकारी पेपेढी ही प्राथमिक असून दुय्यम पातळीवरील सहकारी अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था या बँक म्हणून संबोधण्यास अधिक पात्र असतात.

**सारणी क्रमांक १ : बँके कडून कर्ज घेतांना समस्या येण्यासंबंधी वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया**

| बँकेकडून कर्ज घेतांना समस्या | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५६ | ८९.० |
| नाही | ४४ | ११.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |
| Chi -square | DF | P-value |
| 486.72 | 1 | <0.05 |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वातंत्र्यांश; P-value- P मूल्य सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये बँके कडून कर्ज घेतांना समस्या येण्यासंबंधी वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या प्रतिक्रियांनुसार ८९.० टक्के शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतांना समस्या येत असून ११.० टक्के शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतांना समस्या येत नसल्याचे आढळले. वरील माहितीवरून बँके कडून कर्ज घेतांना समस्या येण्यासंबंधी वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रियांची तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य:४८६.७२, स्वातंत्र्याश: १, सार्थकता:<०. ०५) फरक असल्याचे आढळले. म्हणजेच बहुतांश शेतकऱ्यांना बँके कडून कर्ज घेतांना समस्या येत असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक २: वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँके कडून कर्ज घेतांना आलेल्या समस्यांच्या स्वरूपांसंबंधी माहिती**

| बँकेकडून कर्ज घेतांना जाणवलेल्या समस्यांचे स्वरूप | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| विविध प्रकारची दस्तऐवजे द्यावी लागली | ३०१ | ८४.७ |
| धावपळ करावी लागली | २५६ | ७१.९ |
| शिफारस आणावी लागली | १११ | ३१.३ |
| लाच द्यावी लागली | ५० | १४.३ |
| मंजूर कर्जाच्या तुलनेत कमी कर्ज मिळाल | १२ | ३.२ |
| अर्ज केलेल्या योजनेअंतर्गत कर्ज मिळाले नाही | १०२ | २८.५ |
| व्याजदर अधिक होता | १२३ | ३४.६ |
| बँक कर्मचाऱ्यांनी योग्य प्रतीसाद दिला नाही | २०१ | ५६.५ |

प्रस्तुत सारणी क्रमांक २ मध्ये वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँके कडून कर्ज घेतांना आलेल्या समस्यांच्या स्वरूपांसंबंधी माहिती

दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बँके कडून कर्ज घेतांना विविध प्रकारची दस्तऐवजे द्यावी लागली असणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी ८४.७ टक्के होती. त्याचप्रमाणे बँकेकडून कर्ज घेतांना धावपळ करावी लागली, बँम कर्मचाऱ्यांनी योग्य प्रतिसाद दिला नाही, व्याजदर अधिक होता आणि शिफारास आणावी लागली या समस्या नमूद करणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी क्रमशः ७१.९ टक्के, ५६.५ टक्के, ३४.६ टक्के आणि ३१.३ टक्के होती. तसेच अर्ज केलेल्या योजनेअंतर्गत कर्ज मिळाले नाही, लाच द्यावी लागली व मंजूर कर्जाच्या तुलनेत कमी कर्ज मिळाले या समस्या बँकेकडून जाणवत असणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी क्रमशः २८.५ टक्के, १४.३ टक्के व ३.२ टक्के होती. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो यापैकी विविध प्रकारची दस्तऐवजे द्यावी लागणे, धावपळ करावी लागणे, बँक कर्मचाऱ्यांनी योग्य प्रतिसाद दिला नाही या प्रमुख समस्या होत्या.

**निष्कर्ष**

बहुतांश शेतकऱ्यांना बँके कडून कर्ज घेतांना समस्या येतात. वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो यापैकी विविध प्रकारची दस्तऐवजे द्यावी लागणे, धावपळ करावी लागणे, बँक कर्मचाऱ्यांनी योग्य प्रतिसाद दिला नाही या प्रमुख समस्या होत्या. वर्धा जिल्ह्यातील महत्वपूर्ण अधिक शेतकऱ्यांना मोसमी नुकसानीचा योग्य मोबदला मिळाला नाही. बहुतांश शेतकऱ्यांना प्रसंगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले नाही. शेतकऱ्यांना सामान्यापेक्षा अधिक व्याजदरावर कर्ज घ्यावे लागते. शेतकऱ्यांना सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करतांना त्रास होतो.

**संदर्भग्रंथ सुची**

१. अधिकोषण आणि नाणे बाजार, डॉ. श्री.आ. देशपांडे,
२. संशोधन पद्धती, डॉ. गुरूप्रसाद कछड.
३. सहकाराची मुलतत्वे, मदन.
४. सहकार, प्रा. मोहन सराफ, प्रा. रमेश दापके.
५. भारतीय कामगार समस्या व कामगार धोरण, आंबेडकर पाटील.
६. भारतीय बँकींग, प्रा. भोसले, प्रा. काटे.
७. नागरिक सहकारी बँक, श्री सांबारे द्द
८. रिझर्व बँक ऑफ इंडिया, बुलेटीन.
९. वार्षिक अहवाल नागपूर नागरीक सहकारी बँक